e-ISJN: A4372-3088
p-ISJN: A4372-3089

ISSN: 2394-3122 (Online)
ISSN: 2394-6253 (Print)
Impact Factor: 6.03

Volume 11, Issue 12, December 2024

SK International Journal of Multidisciplinary Research Hub

Journal for all Subjects

Research Article / Survey Paper / Case Study

Published By: SK Publisher

(www.skpublisher.com)

*A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access Multidisciplinary & Multilingual International Journal*

Special Issue: Two Day National Interdisciplinary Conference on "Script Writing"

Organised by: Department of Languages, Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.

(Sponsored by Pradhan Mantri Uchchatar Shiksha Abhiyan Grants to Strengthen Colleges)

# सिंधुताई सपकाळ यांच्या 'मी वनवासी' या आत्मचरित्रावर आधारित 'सिंधूताई सपकाळ' या चित्रपटाच्या पटकथेचे स्वरूप

**प्रा. डॉ. कल्पना गोरले**

मराठी विभाग,

आर. डी. जी. महिला महाविद्यालय,

अकोला

DOI: https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.40

सिंधुताई सपकाळ यांच्या मी वनवासी या आत्मचरित्रातील लेखिकेचा संघर्ष आणि स्त्री-पुरुष नातेसंबंध लेखिकेला जगण्यासाठी करावा लागलेला संघर्ष दिसून येतो. या चित्रपट सिंधुताई सपकाळ या महिलेचे चरित्रात्मक वर्णन दिसून येते. सिंधुताई सपकाळ एका अत्यंत क्लेशकारक जीवनानंतर सामाजिक कार्यकर्त्या बनल्या. वर्धा येथील एका गरीब कुटुंबात त्या जन्माला आल्या अशा गाजलेल्या समाजसेविका सिंधुताई सपकाळ यांच्या वास्तव जीवनावर आधारित' मी सिंधुताई सपकाळ'' हा चित्रपट पाहावयास मिळतो. अतिशय सुंदर पटकथा लिहून हा चित्रपट प्रदर्शित झालेला आहे. सर्वप्रथम येथे पटकथेची स्वरूप ,आत्मचरित्राचे स्वरूप याचा धावता आढावा पाहणार आहोत. या चित्रपटासाठी पटकथा संहिता लेखन अतिशय वास्तविक स्वरूपात पहावयास मिळते. पट कथेतून साकार झालेला हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात गाजलेला दिसून येतो. या चित्रपटासाठी सिंधुताई सपकाळ यांची भूमिका सिने अभिनेत्री तेजस्विनी पंडित यांची भूमिका दिसून येते.

पती श्रीहरी सपकाळ यांच्या भूमिकेत उपेंद्र लिमये दिसून येतात. मी सिंधुताई सपकाळ हा एक भारतीय मराठी भाषेतील चरित्रात्मक चित्रपट आहे या चित्रपटाचे दिग्दर्शक अनंत महादेवन यांनी केलेले आहे .या चित्रपटासाठी सिंधुताई सपकाळ यांची भूमिका तेजस्विनी पंडित या नायिकेने केलेली दिसून येते. या चित्रपटासाठी ज्योती चांदेकर ,उपेंद्र लिमये ,आणि नीना कुलकर्णी यांच्या प्रमुख भूमिका पाहवयास मिळतात.

© 2024, SK Publisher All Rights Reserved

SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Volume 11, Issue 12, December 2024 pg. 182-188

**पटकथेचे स्वरूप:**

कथा म्हणजे गोष्ट प्रत्येक गोष्ट ही चित्रपटाची कथा होऊ शकत नाही. अभिरुची संपन्न व्यक्तीला भावलेली एखादी गोष्ट चित्रपटाची कथा होऊ शकते. कथेच्या खोलात जाऊन चिंतन मनन करावे लागते.उदा: भाषा कथेचा काळ घटना प्रसंग, संवाद, पेहराव ,लकब, वेशभूषा, केशभूषा, पात्रांचा रचना, नेपथ्य इत्यादी या सर्वांच्या नियोजनामधूनच हळूहळू कथा आकाराला येताना दिसून येते. दृश्य माध्यमाच्या साह्याने सांगावयाचे झाल्यास कथासूत्र असते त्याला पटकथा असे म्हटले जाते.

लिखित दृश्यसंहितेला पटकथा म्हणतात. दृश्य आणि ध्वनी यांच्यासहित ते मधून दृश्य प्रतिमांचा आशय अभिव्यक्त होतो. सुप्रसिद्ध दिग्दर्शक सत्यजित राय म्हणतात" पटकथा ही चित्रपटाचा सांगाडा असते दृश्य आणि ध्वनी यांच्याद्वारे पडद्यावर जी व्यक्त होते ते पटकथेची खरे इंगित असते".

**चित्रपट आणि पटकथा:**

सर्व ललित कलांना आपल्या मध्ये समाविष्ट करून घेणारी चित्रपट ही एक व्यापक कला आहे. यामध्ये सर्जनशीलतेचा मोठा वाटा दिसून येतो. जीवनानुभव व सौंदर्य यांची मांडणी तंत्रज्ञानाच्या साह्याने केलेली दिसून येते. प्रेक्षकांच्या मनावर अधिक प्रभाव टाकणारे चित्रपट हे दृकश्राव्य माध्यम आहे.चित्रपट क्षेत्रामध्ये रोजगाराच्या संधी खूप आहेत. पटकथा म्हणजे अर्थपूर्ण दुसऱ्यांची लिखित संहिता आहे. चित्रपट ही व्यापक संकल्पना असून त्यामध्ये अत्यंत आवश्यक असलेला घटक हा पटकथा आहे चित्रपटाचा आत्मा म्हणून पटकथेला ओळखले जाते.

पटकथा लिहिताना कल्पनाशक्ती सर्जनशीलता लेखन कौशल्य आणि विचार कौशल्याची जोड असणे गरजेचे आहे. कोणतेही विषयांची संहिता पटकथे शिवाय व्यवस्थित व प्रभावीपणे होऊ शकत नाही.

**पटकथा लेखन एक कौशल्य:**

१) पटकथेला दिलेली नाव हे आकर्षक आणि कथेसाठी योग्य असावे लागते.

२) संवाद ,पात्राची संवाद संवादाची भाषा शुद्धीसाठी खास लक्ष दिले जाते संवाद कधी पात्राच्या मनोवस्थेसोबत जोडले जाताना दिसून येतात.

३) संगीत ध्वनी काही वेळा दृश्यातील महत्त्वाचे आवाज किंवा संगीताचा प्रभावी उल्लेख केला जातो, ज्यामुळे दृश्य अधिक प्रभावी होऊ शकते.

४) कथेतील संक्षिप्त वर्णन म्हणजेच दृश्य काय घडत आहे ते संवादाशिवाय लिहून पात्राची हालचाल, वातावरण इत्यादी त्यात समाविष्ट असतात

५) पटकथा लेखन एक कलात्मक आणि तंत्रज्ञानिक प्रक्रिया आहे ज्यात कथेला दृश्यात्मक रुपात तयार केले जाते.

६) पटकथेला- शीर्षक दिलेले नाव हे आकर्षक आणि कथेसाठी योग्य असावे लागते.

**पटकथा लेखन क्षेत्रातील रोजगार संधी:**

चित्रपट आणि मालिका क्षेत्रामध्ये रोजगार संधी खूप उपलब्ध आहेत हे दिसून येते. चित्रपटांमध्ये विविध तंत्रज्ञानाची आणि भाषिक जाणकाराची गरज पाहावयास मिळते. पटकथा लेखक, संवाद, लेखक, नेपथ्यकार, छायाचित्रकार, वेशभूषा ,केशभूषाकार ,अभिनेता, दिग्दर्शक, निर्माता, ध्वनिमुद्रक, गीतकार,संगीतकार अशा अनेक ठिकाणी कौशल्ययुक्त व्यक्तींना काम करण्याची संधी मिळू शकते.

मी सिंधुताई सपकाळ या चित्रपटातील भूमिका पटकथाकारांच्या शैलीत:

दिग्दर्शक- अनंत महादेवन द्वारे पटकथा

निर्मिती- सचिन खानोलकर

भूमिका- तेजस्विनी पंडित, ज्योती चांदेकर, उपेंद्र लिमये ,नीना कुलकर्णी

सिने मेट्रोग्राफी-के. राजकुमार

संगीत- अशोक पत्की

द्वारा संपादित- अनंत महादेवन

प्रकाशन तारीख-30 ऑक्टोंबर 2010( दक्षिण आशियाई चित्रपट महोत्सव)

धावण्याची वेळ-120 मिनिटे

भाषा- मराठी

बजेट-१कोटी

**पटकथेचे स्वरूप:**

चित्रपट किंवा एखादी मालिका यासाठी पटकथेची गरज असते .ही पटकथा म्हणजे एखादा चित्रपट कसा दिसणार हे लिहून ठेवलेली संहिता होय. चित्रपट कसा दिसणार याची लिखित स्वरूप म्हणजे पटकथा लेखन असते.भाषेची जाण आणि दृश्य माध्यमाचा चांगला परिचय असणारी व्यक्ती पटकथाकार होऊ शकते. पटकथेच्या आधी पहावयास येते ती म्हणजे कथा चित्रपटाच्या भाषेत' वन लाइनर' असे संबोधले जाते.लेखकाच्या मनात पात्र ठळक होत जातात त्या पात्राविषयी पार्श्वभूमी ठरविणे पात्रांची जडणघडण विविध परस्पर संबंध जाणून कथा आकाराला येताना दिसून येते. पटकथेची दुसरी महत्त्वपूर्ण पायरी म्हणजे प्रसंगाची मांडणी असते. पटकथेत प्रसंग कसा लिहायचा दोन परस्परातले संबंध कशाप्रकारे दर्शवायचे निसर्ग चित्र ,प्रकाशयोजना आणि प्रसंगाची प्रभावी मांडणी हे पटकथा लेखकाला आवर्जून पटकथा सहितेमध्ये लिहावे लागते. प्रभावी मांडणी हीच चित्रपटाची ताकद असते हे दिसून येते.

आत्मचरित्रातील कथेचे पटकथेत कसे रूपांतर झाले:

'मी वनवासी 'या सिंधुताई च्या आत्मचरित्रात त्यांना कुटुंबाशी आणि समाज जीवनात कसा संघर्ष करावा लागला त्याचा अनेक ठिकाणी प्रत्यय येतो.सिंधुताई चा जन्म पिंपरी मेघे जिल्हा वर्धा या गावी झाला. हे गाव म्हणजे महात्मा गांधी यांची सेवाग्राम आणि विनोबा भावे यांचे पवनात या दोन महापुरुषांच्या गावांमध्ये बसलेले आहे. सिंधुताई त्याचे मूळ नाव चिंधाबाई अभिमानजी साठे आहे. सिंधुताई यांचे वडील अभिमानांची नावाप्रमाणे अभिमानी असल्याचे त्या सांगतात. ते अशिक्षित असूनही मुलींच्या शिक्षणासाठी आग्रह धरतात परंतु चौथीची परीक्षा दिल्यानंतर वयाच्या व्या वर्षी चिंधा बाईचे लग्न होते 12. आणि नवरगाव फॉरेस्ट या गावी त्या नांदायला जातात.

'मी वनवासी' या सिंधुताई सपकाळ यांच्या आत्मचरित्रातून कौटुंबिक जीवनातील स्त्री-पुरुष नाते संबंधातील गुंतागुंत अतिशय प्रकर्षाने जाणवते .कौटुंबिक नातेसंबंधातील विसंवादामुळे त्यांचे पती त्यांना घरातून हाकलून देतात. तेव्हा परिस्थिती पुढे शरण न जाता त्यांनी स्वतःचे एक वेगळी स्थान निर्माण केलेले दिसते.कौटुंबिक जीवनात सिंधुताईच्या आयुष्यातील पुरुष व्यक्तिरेखा म्हणजे त्यांचे वडील अभिमानजी साठे, पती श्रीहरी सपकाळ व मोठा भाऊ,आणि जेट ह्या आहेत. आईचा विरोध असतानाही केवळ वडिलांमुळे त्यांना जेमतेम चौथीपर्यंत शिक्षण होत असल्याचे दिसते. वडीला प्रती त्यांना अपार आदर असल्याचेही प्रत्ययास येते .सिंधुताई यांच्या दुसऱ्या पत्नींची मुलगी असूनही त्यांची स्वतःची आई त्यांच्या शिक्षणाला विरोध करताना दिसते. तेव्हा वडील त्यांना साथ देतात. त्या म्हणतात" आमच्या घराण्यात या अगोदर कोणीही शिकले नसल्यामुळे मला शाळेत जायला विरोध केला. सिंधुताई चे वडील अशिक्षित असूनही वडिलांनी शिक्षणासाठी आशीर्वाद दिला. अभिमानजी साठे हे माझे वडील नावाप्रमाणे चांगल्या कर्तुत्वाचा त्याचा अभिमान वाटायचा त्यांचा आशीर्वादच आज पर्यंत ताट मानेने जगायला कारणीभूत ठरला."(पृ.२२) संपूर्ण आत्मचरित्रात वडिलांसोबत त्यांच्या भेटीचा एक प्रसंग आलेला आहे. त्यावेळी घरी सासुने सामान कुलपात ठेवलेले असते त्यांना वडिलांना त्यांच्या आवडीची पुरणपोळीचे जेवण करावेसे वाटते तेव्हा त्यांची चुलत म्हणून त्यांना थोडा गुळ आणि डाळ आणून देते येथे बाप लेकीच्या भेटीचा कारुण्य पूर्ण प्रसंग त्यांनी मांडलेला आहे. वडिलांना जणू त्यांचा मृत्यू कळल्याबरोबर ते लेकीच्या भेटीला आलेले दिसतात. त्यांच्या आईनेही त्यांच्या वडिलांना कधी समजून घेतलेले नसते. ते सिंधुताईला सांगतात" बेटा तुझ्या आईने मला कधी समजून घेतले नाही तू खूप मोठी होशील कोणत्याही परिस्थितीला डगमगू नकोस संकटाला धर्याने तोंड द्यायला शिक अन्यायावर तुटून पड कोणतेही चांगलं काम करताना मागेपुढे पाहू नकोस प्रसंगी कोणत्याही प्रसंगांना तोंड द्यायची तयारी ठेव तू माझाच वंश आहेस बेटा, तू करारी असणारच तुला माझा परिपूर्ण आशीर्वाद आहे. बेटा मी जरी मेलो तरी माझ्या आशीर्वादरूपी आशा शुभकामना तुझ्या पाठीशी सदैव उभ्या असतील"(पृ.५४) याप्रसंगी त्यांच्या वडिलांच्या डोळ्यात अश्रू तरळतात. बाप लेकीच्या या भेटी नंतर तर त्यांच्या वडिलांचा दोन-तीन दिवसातच मृत्यू झाल्याची दिसते. परंतु आयुष्यभर वडिलांच्या उपदेशाची शिदोरी घेऊन करारी वृत्तीने त्या जगताना दिसतात.

सिंधुताई च्या आयुष्यातील कुटुंबातील दुसरी महत्वाची पुरुष व्यक्तिरेखा म्हणजे त्यांची पती श्रीहरी सपकाळ आहे. सिंधुताई सपकाळ एक पत्नी म्हणून त्यांच्या कुठल्याही अपेक्षा पूर्ण केलेल्या दिसत नाहीत. पतीने कधी त्यांना समजूनही घेतले नाही किंवा चार प्रेमाचे शब्द

© 2024, SK Publisher All Rights Reserved

SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Volume 11, Issue 12, December 2024 pg. 182-188

बोललेले दिसत नाहीत.  सिंधुताई च्या आजारात गरोदरपणात किंवा बाळांतपणातही त्यांना पतीने कधी मायेने जवळ घेतल्याचे दिसत नाही.पतीकडून त्यांच्या खूप अपेक्षा असल्याच्या दिसतात. बालवयात लग्न झालेली असतानाही पतीने त्यांच्या शरीराचा कधीच विचार केलेला दिसत नाही. अजाणत्या वयातच त्यांच्या मनावर शरीरावर पतीकडून सतत बलात्कार होत असल्याचे प्रस्तुत आत्मचरित्र दिसते.

घरच्यांकडून सिंधुताईंना तिरस्काराची वागणूक मिळते . सिंधुताई त्यांची शुद्ध भाषा, त्याचे वाचन, त्यांची सहशीलता प्रवाह विरुद्ध दिसून येते. सिंधुताईला बाहेरच्याकडून परकेपणाची वागणूक मिळाल्याचे  दिसते. यामुळे अधिकच त्यांच्यावर अत्याचाराची भर पडलेची दिसते. त्यांचे पती म्हशीचे संगोपन करण्यासाठी सतत जंगलात राहत .कधीतरी दोन महिन्यानंतर ते घरी येत असत तेव्हा सिंधुताई विषयीच्या तक्रारीचा पाढा घरचे त्यांना वाचून दाखवत असताना दिसून येते. अशावेळी पतीचे प्रेम तर सोडाच मार खाण्याची वेळ त्याच्यावर येत असल्याचे दिसते. पतीराज घरच्यांची बाजू घेत असल्यामुळे त्यांना तक्रार करण्याची संधी मिळत नसल्याचे दिसते त्या सांगतात," डोळ्यात तेल घालून म्हशीचे संगोपन करणाऱ्या माझ्या पती राजांनी एक नजर माझ्याकडे ठेवली असती तर? पण हा माझ्या कम नशिबाचा भाग होता वाघांनी  शिकार करू नये म्हणून दक्ष असणारी हे मला घरातले लांडगे रुपी नातलग उभ्याने तो तोडत असताना तोंडातून ब्रह्म सुद्धा काढत नव्हते."(पृ.४५) यामुळे पती शिवाय संपूर्ण जीवनाचे शल्य घेऊन आयुष्यभर त्या जगताना दिसतात. प्रस्तुत आत्मचरित्रात पती-पत्नीच्या नातेसंबंधात सतत  विसंवाद जाणवतो. सिंधुताई स्वतः पती प्रेमाशिवाय जगत असताना दिसतात. पतीने त्याची कधीच काळजी केली नसल्याचे येथे प्रत्ययास येते. आयुष्याचा जोडीदारच त्यांच्यावर अविश्वास दाखवून त्यांना घराबाहेर हाकलून देतो तेव्हा त्याच्यावर आभाळ कोसळण्याचे दिसते. सिंधुताई सपकाळ या सामाजिक कार्यकर्त्या आहेत. चिखलदऱ्यातील आदिवासींना निसर्ग फॉरेस्ट अधिकारी यांच्याकडून त्रास होत असल्याचे दिसते. आदिवासींना सुविधा मिळाव्या यासाठी इंदिरा गांधी जेव्हा मेळघाटात येतात तेव्हा त्यांच्याकडून आदिवासींना त्या सवलती मिळवून देतात. गावातील एका प्रकरणात फॉरेस्ट ऑफिसरने दारू पिऊन गोंधळ घातल्याचे निदर्शनास आल्यावर त्या अमर उपोषणात बसतात. हे प्रकरण तात्कालीन पंतप्रधान स्वर्गीय राजीव गांधी यांच्यापर्यंत जाते तेव्हा 84 गावचे आदिवासी त्यांना सोबत असतात या प्रकरणातही दिल्लीहून वायरलेस वरून संदेश घेऊन त्यांच्या मागण्या मान्य होतात तेव्हा सर्वांचे पाचारण बसल्याचे दिसते.

आदिवासीच्या हितासाठी संघर्ष करीत असताना सिंधुताईला त्यांच्या मुलीला पुण्याला शिक्षणासाठी ठेवण्याची इच्छा होते तेथे त्या दगडूशेठ हलवाई गणपतीचे अध्यक्ष श्री प्रतापराव गोडसे यांच्या मदतीने ममताला सेवा सदनात प्रवेश मिळवून देतात. व त्याच्या शिक्षणाचा खर्च ही प्रसंगी करायचा असे ठरवतात. आणि त्याचे हे स्वप्न पूर्ण होते यासाठी त्या जेव्हा प्रथम पुण्यात येतात तेव्हा बाल गंधर्व सभागृहात भारत रशिया करार होणार असतो यासाठी तेथे दिग्गज मंडळी असतात त्या स्टेजवर जाऊन श्रोत्यांची  मने जिंकतात .याच कार्यक्रमात यशवंत खरात त्यांना आकाशवाणीवर गाण्यासाठी घेऊन जातात यशवंत खरात त्यांना म्हणतात तळागाळातल्या लोकांची सेवा हा घेतलेला वसा टाकू नकोस एक दिवस तू जगाची सेवा राणी सिंधू सपकाळ होशील."(पृ.८५) यशवंतराव यांची ही भविष्यवाणी खरी ठरल्याची प्रचिती येते.

SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Volume 11, Issue 12, December 2024 pg. 182-188

अशाप्रकारे आदिवासींच्या कल्याणासाठी झटणाऱ्या सिंधुताई ह्या केवळ माणसावरच नव्हे तर प्राणीमात्रावरही मायने पांघरून घालताना दिसतात. त्यांचा संघर्ष आणखी संपलेला नसून तो अविरत चालू राहणार असल्याचे त्या सांगतात. आदिवासींसाठी चिखलदरा येथे एक मोठे हॉस्पिटल, शहापूरला एक भव्य वस्तीगृह स्थापन करण्याची त्यांचे स्वप्न असल्याचेही प्रस्तुत आत्मकथनात त्या सांगतात.थोडक्यात मी वनवासी मधील सिंधुताई यांची सामाजिक पार्श्वभूमी वेगळी असली तरी आदिवासींसाठी त्यांनी केलेला संघर्ष अतुलनीय असल्याचे दिसते.

मी सिंधुताई सपकाळ या चित्रपटाच्या पटकथेचे स्वरूप:

सिंधुताई सपकाळ यांच्या मी वनवासी या आत्मचरित्रावर आधारित 'मी सिंधुताई सपकाळ' या चित्रपटाच्या पटकथेचे स्वरूप अतिशय वास्तव दर्शन चित्रफीत च्या माध्यमातून प्रकाशित केलेले पहावयास मिळते. सर्वप्रथम चित्रपटांमध्ये सिंधुताई सपकाळ यांची भूमिका मराठी सिने अभिनेत्री तेजस्विनी पंडित यांनी केलेली दिसून येते .बालपण आणि तरुण पण आणि एक उत्कृष्ट सामाजिक कर्त्या यांची भूमिका अतिशय ज्वलंत स्वरूपाची साकार झालेली दिसते. दिग्दर्शक अनंत महादेवन द्वारे पटकथा आहे.सर्वप्रथम ग्रामीण भागातील निसर्ग वातावरण सुपीक शेती आणि परिसर चित्र अतिशय अल्हाददायक वातावरणात चित्रित करण्यात आलेले दिसते. सर्वप्रथम चित्रपटांमध्ये बालपणीची सिंधुताई सपकाळ चिंधादेवी ही शालेय जीवनाच्या भूमिकेत प्रथम दिसून येते. चित्रपटाची सुरुवात सिंधुताई सपकाळ यांच्या अमेरिका दौऱ्याने होताना दिसते मराठी साहित्य परिषदेच्या निमंत्रणावरून त्या प्रथम विमान प्रवास करून अमेरिकेत जात असतात तेथे त्यांचे खास भाषण आयोजित केलेले असते. या विमान प्रवासात त्यांच्या बालपणीच्या आठवणी विमानात घडलेल्या प्रत्येक छोट्या प्रसंगा बरोबर ताज्या होताना दिसतात .ज्यांचे दर्शन प्रेक्षकांना फ्लॅश बॅक तंत्रद्वारे होते. सिंधुताई अमेरिकेत भाषण करतात तेव्हा त्यांच्या आयुष्यात घडलेल्या काही अविस्मरणीय घटनांची आठवण करून देतात यातून त्यांनी जीवन जगताना केलेल्या लढ्यांची कथा उलगडत जाते. भाषण देण्याकरिता सिंधुताई सपकाळ ज्या वेळेला फ्लाईटमध्ये प्रवासाला जातात. त्यावेळेला आपल्या जीवनाची संपूर्ण हकीकत माजी पायलट शेजारी असतात( विमानातील एक व्यक्तिरेखा) यांच्याशी कथन करतात. हे चित्रपटात निदर्शनास येथे. येथे दिग्दर्शक अनंत महादेवन यांनी प्रथम एखाद्या उंचीवर पोहोचलेल्या व्यक्तीचे शून्यातून पुढे येऊन जेव्हा तो एका उंचीवर ज्यावेळेस जातो. तो प्रसंग येथे कसा ज्वलंत केलेला आहे हे दिसून येते. सिंधुताई सपकाळ यांचा विलक्षण प्रवास म्हणजे प्रतिकूलतेवर विजय मिळवण्याची प्रेरणादायी कथा दिसून येते.

प्रथमदर्शनी दिग्दर्शक अनंत महादेवन यांनी चित्रपटात उंचीचे प्रतीक म्हणून विमान हे प्रतिक वापरून घेतलेली भरारी आणि शून्यातून विश्व निर्माण करणारी एक सामाजिक कार्यकर्ते सिंधुताई सपकाळ यांच्या जीवनाला समर्पित अशी पटकथेतून साकार करूनचित्रपट निर्माण केलेला दिसून येतो. अनाथांची आई ठरलेल्या सिंधुताई सपकाळ यांची भूमिका तेजस्विनी पंडित यांनी अतिशय चोखंदळपणे पार पाडलेली दिसून येते. या चित्रपटांमध्ये सिने अभिनेत्री तेजस्विनी पंडित यांनी अत्यंत करारी वृत्तीने तसेच धाडसपणाने सिंधुताई सपकाळ यांची भूमिका केलेली दिसते. चित्रपटांमध्ये उपेंद्र लिमये यांनी पतीची भूमिका केलेली दिसून येते.

या चित्रपटात सुप्रसिद्ध गायकांची गीत रचना पहावयास मिळते.

१) हे भास्करा क्षितिजावर- गीतकार प्रवीण दवणे, गायन देवकी, पंडित सुरेश वाडकर

२) कशी ही बोलकी झाली घरे-गीतकार सुरेश भट, गायक देवकी पंडित

३) माऊलीच्या दुधापरी आले मृगाचे तुषार -गीतकार ग. दि .माडगूळकर गायन- देवकी पंडित

४) झाडाला धडकून गेली ममतेने पिसाट माता गीतकार बाबासाहेब सौदागर गायन देवकी पंडित

चित्रपटामध्ये भावना विवशतेचा प्रसंग, संगीत ,प्रकाश योजना, वातावरण निर्मिती, सिंधुताई सपकाळ या लेखिकेला करावा लागलेल्या संघर्ष अतिशय सुंदर चित्रीकरण अनंत महादेवन यांनी ग्रामीण भागात अतिशय रम्य वातावरणात केलेली दिसून येते.

मी सिंधुताई सपकाळ हा एक भारतीय मराठी भाषेतील चरित्रात्मक चित्रपट दिसून येतो याचे दिग्दर्शन अनंत महादेवन यांनी केलेले आहे. या चित्रपटात नायिका तेजस्विनी पंडित, ज्योती चांदेकर, उपेंद्र लिमये ,आणि नीना कुलकर्णी यांची प्रमुख भूमिका पाहवयास मिळते. या कलाकारांनी अतिशय समर्पित भूमिका चित्रपटांमध्ये सादर करून उत्कृष्ट असा अभिनय केलेला दिसून येतो.

महाराष्ट्र शासनाने सिंधुताई सपकाळ यांना 2010 साली अहिल्याबाई होळकर पुरस्काराने सन्मानित केले. तसेच

सिंधुताई सपकाळ यांना सामाजिक कार्यासाठी 750 पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे.

अशाप्रकारे सिंधुताई सपकाळ यांच्या 'मी वनवासी' या आत्मचरित्रावर आधारित' मी सिंधुताई सपकाळ' या चित्रपटाच्या पट कथेचे उत्कृष्ट चित्रीकरण करून हा चित्रपट दिग्दर्शित अनंत महादेवन यांनी केलेला दिसून येतो.

## संदर्भ ग्रंथ

१) जाधव मनोहर, साठोत्तरी दलित स्त्री आत्मकथने: एक चिकित्सक अभ्यास, चरित्र -आत्मचरित्र आत्मकथन विशेषांक, सक्षम समीक्षा, पुणे, आनोडि,२०१०

२) लांडे सुमती( सं) स्त्री -पुरुष नातेसंबंध, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र.आ.२००७

३) मराठी भाषिक कौशल्य- विकास संपा .डॉ. पृथ्वीराज तौर, अथर्व पब्लिकेशन्स धुळे, २०१८

:::. Cite this article .:::

गोरले, प्रा. डॉ. कल्पना. (2024). सिंधुताई सपकाळ यांच्या 'मी वनवासी' या आत्मचरित्रावर आधारित "सिंधूताई सपकाळ" या चित्रपटाच्या पटकथेचे स्वरूप. Two Day National Interdisciplinary Conference on Script Writing, 182–188.

https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.40